# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,

एस के बोले मार्ग , प्रभादेवी,मुंबई – ४०००२८ www.siddhivinayak.org , admin@siddhivinayak.org ,दूरध्वनी क्रमांक ०२२-६२४९१११९

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)


---

## श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,मुंबई.

---

**श्रीसिद्धिविनायक डायलेसिस सेंटर चालविण्याकरिता ई – पुनर्निविदा मागविण्याबाबत.**

---

**कालावधी :- माहे नोव्हेंबर २०२४ ते माहे ३१ ऑक्टोंबर २०२७**

---

# ई - पुनर्निविदा सूचना

श्रीसिद्धिविनायक डायलेसीस सेंटर चालविण्यासाठी ३ वर्षाच्या कालावधी करिता निविदेच्या अटी व शर्ती, तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

---

| | |
|---|---|
| ई – निविदा प्रसिद्धीचा वार व दिनांक | – गुरुवार,दिनांक ७ नोव्हेंबर २०२४ |
| निविदापुर्वक बैठक दिनांक, वेळ व स्थळ | – गुरुवार,दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ दुपारी २ :०० वाजता ३ रा मजला न्यास समिती कक्ष |
| ई - निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | – सोमवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ५:०० वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक,वेळ, व स्थळ | – मंगळवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २:०० वा. ३ रा मजला न्यास समिती कक्ष |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ, व स्थळ | – मंगळवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३:०० ३ रा मजला न्यास समिती कक्ष |

ई निविदेसाठी डिजिटल सिंग्नेचर प्राप्त करणे आवश्यक असेल.

निविदेची किमत / शुल्क ना परतावा स्वरूपाचा असेल.

सही/-

कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,
एस के बोले मार्ग , प्रभादेवी,मुंबई – ४०००२८ www.siddhivinayak.org , admin@siddhivinayak.org ,दूरध्वनी क्रमांक ०२२ ६२४९११११
(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

३९) ई – निविदेसोबत खालील नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहेत.

| अ.क्र | अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई – निविदेसोबत निविदेची किंमत / शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बँकेकडील पावती पत्र. |
| २ | बयाना रक्कम (EMD) केल्याबाबतची इंटरनेट बँकेकडील पावतीची प्रत. |
| ३ | आयकर नोंदणी पॅनकार्ड. |
| ४ | कंपनी नोंदणी दाखला |
| ५ | जी एस टी नोंदणी दाखला |
| ६ | पतदारी दाखला (Solvency Certificate) |
| ७ | आर्थिक वर्ष (२०२०-२०२१,२०२१-२०२२,२०२२-२३,२०२३-२४) यापैकी तीन वर्षाचे आय.टी.आर रिटर्न्स. |
| ८ | आर्थिक वर्ष (२०२०-२०२१,२०२१-२०२२,२०२२-२३,२०२३-२४) यापैकी तीन वर्षाचे जी.एस.टी रिटर्न्स. |
| ९ | सन (२०२०-२०२१,२०२१-२०२२,२०२२-२३,२०२३-२४) या ४ वर्षापैकी ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल रक्कम रु. ५ कोटी असल्याबाबतचे सी.ए यांचे प्रमाणपत्र. |
| १० | हमी पत्र |
| ११ | निविदा उघडण्याच्या वेळी कंपनी / संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्यांचे नावाचे प्राधिकारपत्राची प्रत. |
| १२ | मूळ निविदा ( वाणिज्य Commercial ) BOQ |
| १३ | भारतात कोठेही किमान एका डायलेसिस सेंटरला किमान १५ डायलेसिस मशिन असलेला सेट अप / यंत्रणा हाताळल्याचे नमूद असलेल्या MOU ची प्रत |
| १४ | किमान पाच डायलेसिस सेंटर हाताळल्याबाबतचे कागदपत्र ज्यामध्ये एजन्सीचे नाव, हाताळलेल्या डायलेसिस सेन्टरचा पत्ता, डायलेसिस मशिनची संख्या नमूद असणे |
| १५ | निविदाकाराकडून हाताळण्यात येणाऱ्या डायलेसिस सेंटरपैकी एखादे सेंटर बृहन्मुंबई / ठाणे या क्षेत्रातील असल्याबाबत पुरावादर्शक कागदपत्र |
| १६ | किमान एक NABH प्रमाणित डायलेसिस सेंटर हाताळण्याचा अनुभव असल्याबाबत पुरावादर्शक कागदपत्र |
| १७ | निविदाकारास अद्यापपर्यंत किमान ७५ इतकी डायलेसिस मशीन हाताळण्याचा अनुभव असल्याबाबत पुरावादर्शक कागदपत्र |
| १८ | निविदाकारास कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थेमध्ये सदरील कामाच्या अनुषंगाने त्यांना काळ्या यादीत टाकलेले नाही किंवा त्यांच्याविरुद्ध न्यायालयात कोणतेही प्रकरण दाखल झालेले नाही वा प्रलंबित नाही याबाबतचे कायदेशीर हमीपत्र |
| १९ | टीप- अपलोड केलेल्या कागदपत्रांचा एक संच न्यासास सादर करावा. |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,
एस के बोले मार्ग , प्रभादेवी,मुंबई – ४०००२८ www.siddhivinayak.org , admin@siddhivinayak.org ,दूरध्वनी क्रमांक ०२२ -६२४९११११

( फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर )

## निविदाधारकाची माहिती

१) कंपनीचे नाव : ..........................................................................................

२) पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता : ..........................................................................................

..........................................................................................

३) दूरध्वनी क्रमांक : ..........................................................................................

मोबाईल क्रमांक : ..........................................................................................

ई – मेल : ..........................................................................................

४) जी.एस.टी क्रमांक : ..........................................................................................

५) आयकर नोंदणी पॅन क्रमांक : ..........................................................................................

६) संपर्कासाठी व्यक्तीचे नाव : ..........................................................................................

७) मोबाईल क्रमांक : ..........................................................................................

निविदाधारकाची सही व शिक्का

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,

एस के बोले मार्ग , प्रभादेवी,मुंबई – ४०००२८ www.siddhivinayak.org , admin@siddhivinayak.org ,दूरध्वनी क्रमांक ०२२ -६२४९११११

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

## अटी व शर्ती

१) निविदाकाराची कंपनी / संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे (स्वतःच्या मालकीची / PVT.LTD. COMPANY /TRUST किंवा NGO म्हणून नोंदणीकृत असावा ( प्रपत्र – अ – प्रमाणे )

२) कोणीही एकापेक्षा जास्त निविदा सादर करू नये.

३) ई-निविदा उपलोड करतेवेळी निविदेची किंमत / शुल्क रक्कम रु. २५०००/- व बयाना रक्कम रु. १२००००/- ऑनलाईन इंटरनेट बँकिगमार्फत जमा करावी लागेल.बयाणा रक्कमेवर व्याज अनुज्ञेय होणार नाही.

४) ई – निविदा मंजूर झाल्यानंतर कार्यादेश प्राप्त झाल्यापासून ८ दिवसाच्या आत निविदाकाराने तीन वर्षाच्या एकूण मूल्याच्या ५% रक्कमेची बँकगॅरेंटी न्यासास सादर करणे बंधनकारक आहे. न्यासाकडे जमा असलेली बयाणा रक्कम वजा करून उर्वरित रक्कमेकरिता बँक गॅरेंटी स्विकारण्यात येईल. बँक गॅरेंटी राष्ट्रीयकृत वा अनुसूचित बँकेची असणे आवश्यक आहे.

५) निविदाधारकाची वार्षिक आर्थिक उलाढाल ही किमान ५ कोटी इतकी असावी.

६) सदरील निविदा प्रक्रिया ही ३ वर्षासाठीच्या कालावधीसाठी असून निविदाकाराने सादर केलेले दर तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत कायम राहतील तसेच काही कारणास्तव पुढील निविदाकार नेमण्याची प्रक्रिया पूर्ण होऊ न शकल्यास अशा परिस्थितीत पुढील निविदाकाराची नेमणूक होईपर्यंत सादर केलेले दर कायम राहतील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव ठेका कालावधीत भाववाढ दिली जाणार नाही/ मागता येणार नाही.

७) बिलामध्ये मूळ दर व अतिरिक्त कर असा उल्लेख करावा. प्रचलित नियमानुसार आयकर कपात केली जाईल. देयक सादर करताना देयकात प्रतिमाह केलेल्या डायलेसिसच्या एकूण संख्येप्रमाणे देयक सादर करावे.

८) बयाणा रक्कम / बँकगॅरेंटी करार संपल्यावर ९० दिवसानंतर परत केली जाईल. बयाणा रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

९) निविदा मंजूर झाल्यानंतर कार्यादेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत समक्ष येवून स्टँपपेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील. परंतु अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास निविदाकाराने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटीं व शर्ती याच कराराचा भाग असतील.

१०) ऑनलाईन इंटरनेट बँकिंगकरिता एस.बी.आय बँक किंवा इतर इंटरनेट बँकिंगकरिता एस.बी.आय. mops ( multiple option payment system) चा वापर करावा.

११) ई-निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बँकिंगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदेची किंमत / शुल्क व बयाणा रक्कमेबाबतची पावती प्रत अपलोड करावी लागेल.

१२) ई - निविदेसोबत राष्ट्रीयीकृत वा अनुसूचित बँकेचा पतदारी दाखला ( solvency certificate ) अपलोड करणे आवश्यक आहे. पतदारी दाखला एकूण वार्षिक मूल्याच्या अंदाजे ३०% रक्कमे इतका ( म्हणजेच तीन वर्षाच्या कालावधीच्या दृष्टीने तीन वर्षाच्या एकूण मूल्याच्या ३०% रक्कमे इतका ) असावा. तसेच निविदाधारकाची आर्थिक उलाढाल ही वार्षिक मूल्याच्या किमान दहा पट असावी.

१३) ई - निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकावर आहे. अपूर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे, त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापन समितीवर बंधनकारक राहणार नाही.

१४) ज्या दिवशी ई - निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई-निविदेद्वारे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

१५) निविदाकारास डायलेसिस सेंटर चालविण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.

१६) निविदाकारास भारतात कोठेही किमान एका सेंटरला किमान १५ डायलेसिस मशीन असलेला सेट अप / यंत्रणा हाताळण्याचा अनुभव असावा.

१७) निविदाकारास किमान ५ सेंटर हाताळण्याचा अनुभव असावा. याबाबत कोणतेही किमान पाच सेंटर हाताळल्याबाबतचे कागदपत्र ज्यामध्ये एजन्सीचे नाव, हाताळलेल्या डायलेसिस सेन्टरचा पत्ता, डायलेसिस मशिनची संख्या नमूद असणे आवश्यक राहील.

१८) निविदाकाराकडून हाताळण्यात येणाऱ्या डायलेसिस सेंटरपैकी एखादे सेंटर बृहन्मुंबई / ठाणे या क्षेत्रातील असावे तसेच किमान एक NABH प्रमाणित डायलेसिस सेंटर हाताळण्याचा अनुभव असावा. याशिवाय मागील ५ वर्षात संस्थेकडून किमान ७५ डायलेसिस मशीन हाताळली गेली असावीत. ( निविदाकाराकडून हाताळण्यात येणाऱ्या सेंटर मधील एकूण डायलेसिस मशीनची संख्या ७५ असावी)

१९) निविदाकाराचा अनुभव पडताळण्याचे अधिकार न्यासास राहतील.

२०) निविदा सादर करणाऱ्या संस्थेच्या स्टाफ मध्ये NEPHROLOGIST असणे आवश्यक राहील. डायलेसिस सेंटर हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्थेची जबाबदारी न्यासाची राहणार नाही. निविदाकाराने NEPHROLOGIST वैद्यकीय अधिकारी, प्रशिक्षित तंत्रज्ञ, नर्स, इत्यादी कर्मचाऱ्याची पात्रतेसंदर्भातील कागदपत्रांसह यादी निविदा प्रक्रीयेनंतर सादर करावी.

२१) सदर डायलेसिस सेंटर मध्ये वैद्यकीय अधिकारी पूर्ण वेळ हजर असणे आवश्यक राहील, तसेच डायलेसिस घेणाऱ्या रुग्णांची रिपोर्टस NEPHROLOGIST कडून वेळोवेळी तपासून घेणे आवश्यक राहील.

२२) डायलेसिस सेंटर मधील प्रशिक्षित तंत्रज्ञाकडे BSC IN DIALYSIS TECHNICIAN CERTIFICATE किंवा किमान एक वर्षाचा FELLOWSHIP IN DIALYSIS TECHNICIAN CERTIFICATE यासह BLS ( BASIC LIFE SUPPORT ) प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

२३) निविदाकारास डायलेसिस करण्यासाठी आवश्यक सर्व सामग्री पुरवावी लागेल. डायलेसिस साठी आवश्यक असलेली औषधे ( DIALYZER BLOOD TUBES ) इत्यादी निविदाकाराला स्वखर्चाने आणावी लागतील.

२४) निविदाकाराने डायलायझरचा पुनर्वापर करण्यापूर्वी सदरील डायलायझरची FBV ची मात्रा मूळ मात्रेच्या ७५% पर्यंत असल्यासच पुनर्वापर करता येईल. मात्र त्यासाठी निविदाकाराकडे डायलेसिस सेंटर मध्ये डायलायझर री – प्रोसेसर मशीन असणे आवश्यक राहील.

२५) डायलेसिससाठी येणाऱ्या रुग्णांची रक्त तपासणी चांगल्या दर्जाच्या प्रयोगशाळेतून २ महिन्यातून एकदा करण्याची दक्षता निविदाकारांने घ्यावी.

२६) डायलेसिस सेंटर मध्ये वापरण्यात येणाऱ्या पाण्याची AAMI च्या मानांकानुसार प्रतिमाह बॅक्टेरिअल कल्चर आणि एंडोटॉक्सिन चाचणी तसेच दर सहा महिन्यांनी केमिकल ॲनालिसीस करणे आवश्यक राहील.

२७) डायलेसिस साठी येणाऱ्या रुग्णांना NEPHROLOGIST ने सूचित केलेल्या डोसच्या मात्रेनुसार ERYTROPOIETIN आणि आयर्नची इंजेक्शन देणे आवश्यक राहील.

२८) निविदाकारानी रुग्णाच्या रक्त तपासण्या वेळच्या वेळी चांगल्या दर्जाच्या प्रयोगशाळांमधून करणे आवश्यक राहील.

२९) डायलेसिस सेंटर मध्ये डायलेसिससाठी येणाऱ्या रुग्णांबाबत आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास रुग्णांना पुढील उपचारासाठी रुग्णालयामध्ये पोहचविण्यासाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

३०) निविदाकारास कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थेमध्ये सदरील कामाच्या अनुषंगाने त्यांना काळ्या यादीत टाकलेले नाही किंवा त्यांच्याविरुद्ध न्यायालयात कोणतेही प्रकरण दाखल झालेले नाही वा प्रलंबित नाही याबाबतचे कायदेशीर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३१) डायलेसिस सेंटर मध्ये डायलेसिस संदर्भात कोणतीही अप्रिय घटना घडल्यास त्यानुषंगाने उद्भवणाऱ्या न्यायालयीन तसेच समन्यायिक CONSUMER COURT इत्यादी प्रकरणांना हाताळण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

३२) मेडिकोलिगल प्रकरणे उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाकारांची राहील.

३३) डायलेसीस सेंटर मध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांचा सविस्तर तपशील सुस्थितीत ठेवण्यासाठीची यंत्रणा निविदाकाराकडे असणे आवश्यक राहील.

३४) गरीब व गरजू रुग्णांना डायलेसिससाठी मदत करण्याच्या सद्हेतूने हा उपक्रम न्यासाकडून राबविण्यात येतो. मात्र न्यासामार्फत नियुक्त एजन्सीकडून डायलेसिस दरम्यान रुग्णांबाबत कोणतेही अप्रिय घटना घडल्यास यासंदर्भात / यानुषंगिक पुढील जबाबदारी न्यासाची राहणार नाही.

३५) मूल्य निविदेत नमूद मुल्यानुसार तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पूर्तता होत नसल्याचे निदर्शनास आल्यास मूल्य निविदा उघडल्यानंतर देखील निविदाकारास अपात्र ठरविण्याचे अधिकार न्यासास राहतील.

३६) कोणतीही कारणे न देता ई-निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

३७) उपरोक्त अटीं व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाकाराच्या कोणत्याही अटी व शर्ती न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

३८) निविदाकारास डायलेसिस सेंटर साठीच्या एजन्सीचे काम बंद करावयाचे असल्यास याबाबतची लेखी नोटिस किमान तीन महिने आधी न्यासास देणे बंधनकारक राहील. निविदा कालावधीपूर्वी निविदाकाराने काम बंद केल्यास निविदाकारास न्यासाच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेसाठी BLACKLIST करण्यात येईल तसेच त्यांची बयाणा रक्कम ( EMD) व बँक गॅरेंटी जप्त करण्यात येईल.

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,

एस के बोले मार्ग , प्रभादेवी,मुंबई – ४०००२८ www.siddhivinayak.org , admin@siddhivinayak.org ,दूरध्वनी क्रमांक ०२२ -६२४९११११

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)


४०) निविदेच्या अनुषंगाने निविदाकारास कोणत्याही आवश्यक माहिती साठी खालील क्रमांकावर संपर्क करावा

श्रीमती वीणा पाटील - कार्यकारी अधिकारी – ९९३०९४२४२८ ,

डॉ. संदीप उत्तम राठोड - उप कार्यकारी अधिकारी – ७९७७७५३७१६,

श्रीमती मेधा पराग चुरी – विभाग प्रमुख – ९७०२२८२४००

विवेक मधुकर नागवेकर – लिपिक – ९७०२६५३३३३

Vpatil

वीणा पाटील

कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,
एस के बोले मार्ग, प्रभादेवी,मुंबई – ४०००२८ www.siddhivinayak.org , admin@siddhivinayak.org ,दूरध्वनी क्रमांक ०२२ -६२४९११११
(महाराष्ट्र शासन नियंत्रित)


## SCOPE OF WORK

१) रुग्णांना डायलेसिसची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली सर्व यंत्रणा कार्यान्वित करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

२) डायलेसिस साठी आवश्यक असलेली औषधे ( DIALYZER BLOOD TUBES ) इत्यादी निविदाकाराला स्वखर्चाने आणावी लागतील.

३) डायलेसिससाठीची यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ ( जसे NEPHROLOGIST अनुभवी वैद्यकीय अधिकारी, प्रशिक्षित तंत्रज्ञ नर्स.इत्यादी) उपलब्ध करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

४) डायलेसिसच्या अनुषंगाने वैद्यकीय, न्यायवैद्यकीय (MEDICOLEGAL) व अशी संबंधित अन्य कागदपत्रे / अभिलेख तयार करण्याची, सुस्थितीत ठेवण्याची न्यासाच्या पाहणीसाठी उपलब्ध ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाकाराची राहील.या संदर्भातील कोणतेही अभिलेख पाहणी करण्याचा तपासणी करण्याचा अधिकार न्यासास असेल.

५) डायलेसिससाठी येणाऱ्या रुग्णांच्या माहितीबाबतचा तपशील गोपनीय ठेवण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. तसेच सदरील माहितीच्या अनुषंगाने देखरेखीसाठी MIS DASH BOARD तयार करणे त्यासाठीचा ACCESS उपचार करणाऱ्या NEPHROLOGIST ला उपलब्ध करून देणे याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

६) याठिकाणी कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांना विशिष्ट गणवेश उपलब्ध करणे, त्यांचे ओळखपत्र तयार करणे, डायलेसिस सेंटर मध्ये आचार संहितेचे पालन करणे, आपल्या वर्तनामुळे रुग्ण , इमारतीतील रहिवाश्यांना तसेच कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही.याची दक्षता घेणे इत्यादी जबाबदारी निविदाकाराची राहील.

७) डायलेसिस दरम्यान किंवा त्यानुषंगाने कोणत्याही प्रकारची MEDICOLEGAL समस्या उदभवल्यास त्याचे निवारण करण्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाकाराची असेल.

८) कोणत्याही स्वरूपाच्या साथीच्या उदभवलेल्या आजाराच्या अनुषंगाने केंद्र/ राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारित केल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार MASKS, PPE KIT, SANITIZER SPREADING MACHINE WITH SODIUM HYPOCLORITE SOLUTION इत्यादी अथवा अन्य तत्सम बाबी निविदाकाराने स्वतःच्या स्तरावरून उपलब्ध करून घ्याव्यात व त्यानुसार उपचार करावेत. अशा प्रसंगी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

९) डायलेसिस सेंटरवर निर्माण होणारा कचरा व अन्य बायोमेडिकल कचरा यांची विल्हेवाट प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

१०) सदरील डायलेसिस सेंटर चालविण्यासाठी न्यासाकडून डायलेसिस मशिन्स आणि RO WATER TREATMENT PLANT वार्षिक दुरुस्ती देखभालासह (AMC) उपलब्ध करून देण्यात येईल.

११) सदर केंद्र चालविण्यासाठी केंद्रास आवश्यक असलेला विद्युत पुरावठा, पाणी पुरवठा व त्यानुषंगाने खर्च न्यासाकडून पुरविण्यात येईल.

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,

एस के बोले मार्ग , प्रभादेवी,मुंबई – ४०००२८ www.siddhivinayak.org , admin@siddhivinayak.org ,दूरध्वनी क्रमांक ०२२ -६२४९११११९


## ( सी.ए यांच्या लेटरहेडवर )

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे .......................................................................................................

यांच्या व्यवसायाची वर्ष (२०२०-२०२१,२०२१–२०२२,२०२२-२३,२०२३-२४) या चार वर्षापैकी कोणत्याही कमाल (जास्त उत्पन्न) तीन वर्षाची उलाढाल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२० – २०२१ | |
| २ | वर्ष २०२२ – २०२३ | |
| ३ | वर्ष २०२२ – २०२३ | |
| ४ | वर्ष २०२३ – २०२४ | |
| | एकूण उलाढाल | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :- / / २०२४

लेखापरीक्षकाची सही / चार्टड अकाऊंट
( नाव / सही शिक्का )

नोंदणी क्रमांक :-

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,
एस के बोले मार्ग , प्रभादेवी,मुंबई – ४०००२८ www.siddhivinayak.org , admin@siddhivinayak.org ,दूरध्वनी क्रमांक ०२२-६२४९११११९

( फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर )

# हमी पत्र

दिनांक - / / २०२४

प्रति,
कार्यकारी अधिकारी
श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी , मुंबई – २८

महोदया,

मी / आम्ही ........................................................................................ खालील निम्न स्वाक्षरीकार

याद्वारे घोषित करतो की,

१. मी / आम्ही कागदपत्रे , अटी व शर्ती , अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही
२. मी / आम्ही नमूद केलेला दर हा मूळ दर (सर्व खर्चासह ) व अधिक कर ( जी.एस.टी ) असा आहे.
३. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालावधीत न्यासाने विहित केल्यानुसार रक्कम देण्यास बांधील आहोत.
४. ई – निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्ती आमच्यावर बंधनकारक राहतील.
५. आम्हास माहित आहे कि , निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.
६. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती तसेच अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या आम्हास बंधनकारक आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी,

एस के बोले मार्ग , प्रभादेवी,मुंबई – ४०००२८ www.siddhivinayak.org , admin@siddhivinayak.org ,दूरध्वनी क्रमांक ०२२ -६२४९९९९९
(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

(फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर)

मूळ निविदा (वाणिज्यिक–**Commercial**) बीड ऑफ कोटेशन **(BOQ)**

निविदेमध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव : ______________________________

निविदाधारकाचा कायमचा पत्ता : ______________________________

______________________________

निविदाधारकाचा जी.एस.टी.नोंदणी क्रमांक : ______________________________

| अ. क्र. Sr. No. | तपशील Description | प्रति डायलेसिस करिता दर (कर वगळून ) Rate Per Dialysis ( EXCLUDING GST ) |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | Operating charges per haemodialysis for 1st year | |
| 2 | Operating charges per haemodialysis for 2nd year | |
| 3 | Operating charges per haemodialysis for 3rd year | |

निविदाधारकाची सही व शिक्का